N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): ठाणे शहर **P.S.**(ठाणे): ठाणे नगर **Year** (वर्ष): 2022

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0140 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 23/08/2022 21:05 बजे

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भारतीय दंड संहिता १८६०	३८४
2	भारतीय दंड संहिता १८६०	३८९
3	भारतीय दंड संहिता १८६०	120-B

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार **Date From** (दिनांक पासून): 20/04/2021

Time Period (कालावधी): पहर 4 **Date To** (दिनांक पर्यंत): 20/04/2021

Time From (वेळेपासून): 11:00 बजे

Time To (वेळेपर्यंत): 11:00 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

Date (दिनांक): 23/08/2022 **Time** (वेळ): 19:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

Entry No. (नोंद क्र.): 037 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 23/08/2022 21:05 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): उत्तर, 1 किमी

Beat No. (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): कोर्ट नाका, ठाणे प

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विकास गबाजी दाभाडे

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : गबाजी दाभाडे

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1982 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No.(अ.	Id Type (ओळखपत्राचा प्रकार)	Id Number (ओळखपत्राचा क्रमांक)

S.No.(अ.	Id Type (ओळखपत्राचा प्रकार)	Id Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address (पत्ता):**

S.No.(अ. क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	1103, मलबेरी,रूनवाल गार्डन सिटी,ठाणे पश्चिम,ठाणे नगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	1103, मलबेरी,रूनवाल गार्डन सिटी,ठाणे पश्चिम,ठाणे नगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

Mobile (मोबाइल नं.): 91-9821439080

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	सोनु योगेंद्र जलान		वडील का नाम : योगेंद्र जलान	1. प्लॅट नं 1202, टॉवर नं 2,रुस्तमजी ओझॉन, ,मालाड, प मुबंई- 400064 , ठाणे नगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत
2	केतन मनसुखलाल तन्ना		वडील का नाम : मनसुखलाल तन्ना	1. 2001,, रुस्तमजी ओझॉन,,टॉवर नं 3, गोरेगाव टेलिफोन,एक्सचेंजच्या पाठीमागे गोरेगाव ,ठाणे नगर,ठाणे शहर,महाराष्ट्र, भारत
3	जय केतन तन्ना		वडील का नाम : केतन तन्ना	1. 2001 ,रुस्तमजी ओझॉन, टॉवर नं 3,, गोरेगाव टेलिफोन एक्सचेंजच्या प, गोरेगाव प मुबंई- ,ठाणे नगर,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये))

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

S.No. (अ. क्र.)	UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.)

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत):**

ठाणेनगर पोस्टे गुरनं.140/2022 भा.द. वि. कलम 384, 389, 120(ब) प्रमाणे श्री. विकास गबाजी दाभाडे, वय 40 वर्षे, धंदा- व्यापार, राह. 1103, मलबेरी, रूनवाल गार्डन सिटी, ठाणे पश्चिम (मो.नं 9821439080) समक्ष विचारले वरून फिर्यादी जबाब देतो की, मी वरील प्रमाणे पत्यावर माझे कुटुबांसह राहण्यास आहे. मी बांधकाम व्यवसाईक असुन त्यावर मिळणारे उत्पन्नावर माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो. माझी समाजामधील प्रतिष्ठित व्यक्ती व व्यवसाईकांमध्ये चांगली पत आहे. माझे वडील पोलीस अधिकारी होते त्यामुळे ब-याच पोलीस अधिका-यांशी माझी ओळख आहे. मी मा. मुख्य न्यायदंडाधिकारी सा., मुख्य न्यायालय, ठाणे यांचे न्यायालयात क्रि. एम. ए. क्रंमाक 1812/2022 अन्वये अर्ज दाखल केलेला होता. त्या अनुषंगाने मा. न्यायालयाने म.जा.क्र. 1562/2022 दिं 18/08/2022 नुसार प्रस्तुत प्रकरणी क्रि.प्रो.को. कलम 156 (3) अन्वये गुन्हा नोंदवुन गुन्हाचा तपास करण्याचे ठाणेनगर पोलीस स्टेशनला आदेशित केले आहे. एप्रिल मे 2021 मध्ये माझे असे निदर्शनास आले की, सोनु जलान नावाच्या इसमाने न्युज चनेलला दिलेल्या मुलाखतीमध्ये त्यांने माझे विरूध्द खोट्या, बिनबुडाच्या व माझी बदनामी व्हावी अशा तक्रारी केलेल्या आहेत. सदर मुलाखतीमध्ये अशी तक्रार केली होती की, सोनु जलान, केतन तन्ना,व इतर लोकांकडुन काही पोलीस अधिका-यांनी व खाजगी इसमांनी खंडणी मागितली होती. सदरची खंडणीची रक्कम त्यांनी स्विकारून पोलीस अधिका-यांना दिली. परंतु सदरची बाब ही खोटी बिनबुडाची असुन माझे चरित्र्यास हानी पोहोचविणारी आहे. त्यामुळे मी लागलीच दि.

05/05/2021 रोजी माझी बिनशर्त माफी मागावी या करीता श्री. केतन तन्ना व सोनु जलाल यांना माझे वकील नामे श्री. मयुर कुटे यांचे मार्फतीने कायदेशीर नोटीस पाठविलेली होती. मी पाठविलेल्या नोटीसीला त्यांनी उत्तर दिले नाही. त्या अगोदर श्री. जय केतन तन्ना यांनी दिनांक 08/03/2019 रोजी मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांना तक्रारी अर्ज केला होता की, ठाणेनगर पोलीस ठाणे गुरनं. 93/18 भा.द.वि. क. 363, 384, 387, 34 भारतीय हत्यार अधिनियम चे कलम 3, 25 सह मोक्का कायदा क. 3(1)(ii), 3(2), 3(4) या गुन्हयामध्ये त्यांचे वडील नामे- केतन तन्ना यांना चुकीचे पध्दतीने अडकविलेले आहे. सदर अर्जाचे अवलोकन केले असता त्यामध्ये मी श्री. जय केतन तन्ना यांचेकडुन 50 लाख रू. घेतल्याचे कोठेही नमुद केलेले नाही. परंतु दि. 30/07/21 रोजी श्री. केतन मनसुखलाल तन्ना यांनी ठाणेनगर पोलीस ठाणे येथे दाखल केलेला गुरनं. 151/21 भा.द.वि. क. 384, 386, 387, 389, 392, 324, 323, 166, 504, 506, 506(2), 120(बी), 109 सह शस्त्र अधिनियम कलम 3, 25 या गुन्हयामध्ये खंडणी विरोधी पथक, ठाणे शहर यांचे कार्यालयाबाहेर असलेल्या जय तन्ना याचे गाडीतुन जय तन्ना यांनी 50 लाख रूपये काढुन मला दिल्याचे नमुद केलेले आहे. सदर तक्रारी अर्ज हा सोबत जोडलेला आहे. त्यानंतर दिनांक 19/09/2019 रोजी व दिनांक 03/10/2019 रोजी केतन तन्ना याने मा. पोलीस महासंचालक, मुंबई, महाराष्ट्र यांना तक्रारी अर्ज केलेले आहेत. सदर अर्जामध्ये पुर्वी दिलेल्या अर्जाप्रमाणे कथन केलेले आहे. सदरचे अर्ज हे सोबत जोडलेले आहेत. फिर्यादी रितेश शहा यांने दिलेल्या फिर्यादीवरून सोनू जलान, केतन तन्ना, व इतर यांचे विरूध्द ठाणे नगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं 93/2018 भा.दं.वि.कलम. 363, 384, 386, 387, 34 सह भा.ह.का.क 28 सह मपोका कलम 3(1)(2), 3(4) अन्वये गुन्हा नोंद असुन त्यामध्ये सोनु जलान व केतन तन्ना यास अटक करणेत आलेली आहे. सदर गुन्हयांचा तपास चालु असताना सदर केसच्या तपास पथकामध्ये माझे परिचयाचे पो. निरी. राजकुमार कोथमिरे हे होते. त्या गुन्हयांचा तपास चालु असताना जुन 2018 मध्ये एके दिवशी केतन तन्ना व जय तन्ना यांनी काका बारचे मालक जगन यांचे सह कोर्टनाका, ठाणे येथे मला प्रत्यक्ष भेटुन पो.निरी. राजकुमार कोथमिरे यांचेकडुन सोनु जलान व केतन तन्ना यांना गुन्हयामध्ये काही मदत करावी अशी विनंती केली होती. मी त्यांचे काम करण्यास नकार दिला व त्यावेळी अशी कामे मी करत नाही असे सांगुन मी जगन यावर रागावलो. त्यामुळे सोनू जलान व केतन तन्ना यांचे काम मी न केल्याने ते माझेवर राग धरून होते. केतन तन्ना, जगन व जय तन्ना याने आम्ही तुला बघुन घेऊ असे धमकावले होते. त्यानंतर सोनू जलान व केतन तन्ना यांना त्या केसमध्ये अटक झाली व पुढे केतन तन्ना व सोनू जलान त्यांचे विरूध्द दोषारोप पत्र ही दाखल झाले. सोनू जलान व केतन तन्ना यांने त्यांचे विरूध्द दाखल एम.सी.ओ.सी. केस रद्द होणे करीता मा. उच्च न्यायलय, मुंबई येथे क्रिमीनल अपील नं. 159/2020 दाखल केले आहे. त्यामध्ये सुध्दा त्यांने तपासी अधिका-यांनी व इतर खाजगी व्यक्तीने खंडणीची मागणी केले बाबत उल्लेख केलेला नाही.त्यानंतर केतन तन्ना व सोनू जलान हे सुमारे दोन वर्षानंतर जामीनावर बाहेर आल्यानंतर त्यांनी नमुद मोक्का केसचा तपास करणा-या अधिका-यांविरूध्द तक्रारी केल्या. त्यानंतर सदर प्रकरणी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडुन सदर अर्जाच्या अनुषंगाने तपास सुरू करण्यात आला. त्यानुसार अर्जामधील अर्जदार व गैरअर्जदार व्यक्तींना बोलावुन त्यांचे जबाब घेण्यात आले. अर्जामध्ये नमुद केलेल्या ब-याच लोकांनी आम्ही कोणत्याही पोलीस अधिकारी किवा खाजगी व्यक्तीला पैसे दिले नसल्याचे आपल्या जबाबात म्हटले आहे. तसेच सोशल मिडीया मार्फत प्रसारित झालेले अर्जातील व्यक्तीचे निलेश नंदा उर्फ जम्बो व कुशल रामभीया यांचे जबाबात त्यांनी कोणत्याही खाजगी इसम अगर पोलीस अधिकारी यांना पैसे दिले नाही असे स्पष्ट उल्लेख केलेला आहे. जुन 2021 मध्ये प्रविण बेहरा यास मध्यस्थी घालुन सोनू जलान, केतन तन्ना व जय तन्ना याने मला संपर्क केला त्याने माझे विरूध्द केलेल्या तक्रारी मागे घेण्यासाठी तडजोड करण्यास तयार आहे काय असे विचारले व 50 लाख रूपये सोनू जलान, केतन तन्ना, व जय तन्ना यांना दिल्यास ठाणेनगर पोलीस स्टेशन येथे दाखल करणारे फिर्यादीमध्ये माझे नाव टाकणार नाही असे सांगितले. मी त्यांचे विरूध्द कोणतेही काम केले नसल्याने व मी निष्पाप असल्याने मी त्यांची मागणी केलेले 50 लाख रूपये रक्कम देण्यास नकार दिला. त्याचे संभाषणातुन मला फसवले जाणार असल्याचे माझे लक्षात आल्याने मी लागलीच त्यांना आपसात समझोता करून घ्या असे सांगितले होते. एप्रिल ते जुन 2021 च्या दरम्यान सोनू जलान, केतन तन्ना व जय तन्ना यांनी आपसात संगनमत करून व कटकारस्थान रचुन जुन 2018 मध्ये सोनू जलान व केतन तन्ना यांनी ठाणेनगर पोलीस स्टेशन गु.र.नं. 93/2018 या गुन्हयांत माझे परिचयाचे पो.निरी. राजकुमार कोथमिरे यांचे माध्यमातुन गुन्हयांत त्याचे बाजुने तपास करणेकामी जय तन्ना व केतन तन्ना यांनी काका बार, मालाड, मुंबई याचे मालक जगन यांचे सह मला कोर्ट नाका येथे एप्रिल 2021 मध्ये प्रत्यक्ष भेटुन केलेली विनंती प्रमाणे मी त्यांना मदत करण्यास नकार दिला. याचा राग मनात धरून जुन 2021 मध्ये सोनू जलान, केतन तन्ना व जय तन्ना यांनी आपसात कट करून प्रविण बेहरा यास मध्यस्थी मार्फत संपर्क करून मला खोट्या गुन्हयांत न अडकवण्याकरीता 50 लाख रूपये रकमेची मागणी केली व ती मी त्यांना दिली नाही म्हणुन माझे विरूध्द खोटा गुन्हा दाखल करणार असे सोनू जलान, केतन तन्ना व जय तन्ना यांनी मध्यस्थी इसम नामे- प्रविण बेरा याचे मार्फतीने सांगितलेले होते. त्यानंतर दिनांक 30/07/2021 रोजी संध्याकाळी मला समजले की, केतन तन्ना याने दिलेल्या फिर्यादीवरून ठाणेनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं 151/2021 भा. दं. वि. कलम 384, 386, 387, 389, 392, 324, 323, 166, 504, 506, 506(2), 120(बी), 109 सह शस्त्र अधिनियम कलम 3, 25 अन्वये गुन्हा नोंद असुन त्यामध्ये मला आरोपी केलेले आहे. त्या दिवशी केतन तन्ना व सोनू जलान यांनी वृत्तवाहीन्यांना दिलेल्या मुलाखतीमध्ये सुध्दा माझे नावाने फिर्याद दिली असल्याचे सांगितले. त्यानंतर सदर ठाणेनगर पोलीस स्टेशन गु.र.नं 151/2021 चा तपास ठाणे शहर पोलीसांचे विशेष पोलीस पथकाने केला त्यांचे समक्ष माझा जबाब झालेला आहे. आज पावेतो माझे विरूध्द पुरावा उपलब्ध झाला नसल्याने माझे विरूध्द कोणतेही कारवाई करण्यात आलेली नाही. त्याप्रमाणे माझा परिचय असलेले समीर भारती, पो.निरी. राजकुमार कोथमीरे व अर्जातील इतर व्यक्तीकडे माझे प्रमाणेच पैशाची मागणी सोनू जलान, केतन तन्ना, जय तन्ना व नातेवाईक यांचे मार्फत केली असल्याचे मला समजते. त्यापैकी समीर भारती यांनी पैसे देण्यास नकार दिला असल्याने त्यांचे नाव पुरवणी जबाबामध्ये घेण्यात आले असल्याचे मला समजले आहे. केतन तन्ना, जय तन्ना व सोनू जलान यांनी संगणमत करून ठाणेनगर पोलीस स्टेशन येथे दिलेल्या फिर्यादमध्ये काही पोलीस अधिकारी, माझेसह व इतर व्यक्तीना त्यांनी मागणी केलेली मोठी रक्कम न दिल्याने जाणीवपुर्वक त्यांची नावे गुंतवुन गु.र.नं. 151/2021 ही खोटी फिर्याद दिली आहे. तरी एप्रिल ते जुन 2021 चे दरम्यान ठाणेनगर पोलीस स्टेशन गु.र.नं 93/2018 या गुन्हयांत माझे परिचयाचे पो.निरी राजकुमार कोथमिरे यांचे माध्यमातुन गुन्हयांत त्याचे बाजुने तपास करणेकामी मदत करण्याकरीता जय तन्ना व केतन तन्ना यांनी काका बार, मालाड, मुंबई याचे मालक जगन यांचे सह मला कोर्ट नाका येथे एप्रिल 2021 मध्ये प्रत्यक्ष भेटुन सांगितले असता मी त्यांना मदत करण्यास नकार दिला. तसेच प्रविण बेहरा या मध्यस्थी इसमामार्फत संपर्क करून मला खोट्या गुन्हयांत न अडकवण्याकरीता 50 लाख रूपये रकमेची मागणी केली ती मी पुर्ण न केल्याने त्याचा राग मनात धरून जुन 2021 मध्ये सोनू जलान, केतन तन्ना व जय तन्ना यांनी आपसात कट केला म्हणुन माझी इसम नामे- 1) सोनु जलान 2) केतन तन्ना 3) जय तन्ना यांचेविरूध्द 384, 389, 120(ब) अन्वये फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब संगणकावर टंकलिखित केलेला असुन तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरा आहे.

13.Action **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): JAYRAJ NARSINGRAO RANAVARE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद):

No.(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Apabhade

15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाव): JAYRAJ NARSINGRAO RANAVA

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.):

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
Physical features, deformities and other details of the suspect/accused: (If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

S.No.(अ.क्र.)	Sex (लिंग)	Date/Year of Birth (जन्म	Build (बांधा)	Height (cms.) (उंची	Complexion (रंग)	Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा)
1	2	3	4	5	6	7
1	पुरुष					चेचक के दाग: NO
2	पुरुष					चेचक के दाग: NO
3	पुरुष					चेचक के दाग: NO

Deformities/ Peculiarities	Teeth (दात)	Hair (केस)	Eyes (डोळे)	Habit(s) (सवयी)	Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी)
8	9	10	11	12	13

Language /Dialect (भाषा/बोलीभाषा)	Place Of (का स्थान)					Others (इतर)
	Burn Mark	Leucoderma (कोड)	Mole (तिळ)	Scar (व्रण)	Tattoo (गोदण)	
14	15	16	17	18	19	20

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)